**MHKO070008502024**

<u>रे.दि.मु.क्र. ११९/२०२४ मधील नि.१२ खालील आदेश</u>

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द झालेला विना म्हणणे–कैफीयत चौकशीचा आदेश रद्द होणेसाठी व त्याकरिता झालेला २५ दिवसांचा विलंब माफ होवून मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. अर्जात प्रतिवादी यांचे कथन की, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी व त्याचा कायदेशीररित्या तलाक झाला असून प्रतिवादी त्यांची पत्नी नसल्याचे जाहिर होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी या कर्नाटक राज्यातील अथणी येथे शिक्षण घेत असल्याने तसेच अथणी हे गांव जयसिंगपूर येथून ५० ते ६० कि.मी. अंतरावर असल्याने, तसेच त्यांची परिक्षा असल्यामुळे त्यांना वकिलांना भेटून मुदतीत कैफियत व म्हणणे देणे शक्य झालेले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचे विरुध्द विना म्हणणे–कैफीयतचा आदेश करणेत आला आहे. तरी, प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द झालेला विना म्हणणे–कैफीयत चौकशीचा आदेश रद्द होणेसाठी व त्याकरिता झालेला २५ दिवसांचा विलंब माफ होवून मिळणेकरिता दाखल केला आहे.

३. वादीतर्फे सदर अर्जास म्हणणे देण्यात आले आहे. वादीचे कथन की, प्रतिवादीने दिलेले कारण संयुक्तिक नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. वादी–प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी या त्यांची पत्नी नसल्याचे जाहिर होवून मिळणेसाठी दाखल केला

आहे. तसेच, प्रतिवादी यांनी त्यांचे कथनाचे पुष्टयर्थ नि.१२ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास वादीचे नुकसान होणार नाही, याउलट अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादीचे अपरीमित नुकसान होणार आहे. तसेच प्रतिवादी यांनी म्हणणे–कैफियत उशीरा दाखल करण्यामागे संयुक्तीक कारण दिले आहे. सबब, अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता मी खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (नि.१२) मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादीला कैफियत व म्हणणे देणेकरिता झालेला उशीर माफ करण्यात येतो व तीचे म्हणणे व कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेणेत येते.

PRASHANTKUMAR ASHOK PATIL
Digitally signed by PRASHANTKUMAR ASHOK PATIL
Date: 2025.04.24 13:57:49 +0530

जयसिंगपूर
दिनांक २४/०४/२०२५

(पी.ए.पाटील),
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
जयसिंगपूर.